MHYA140006642022

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.०९/२०२२ मध्ये</u>**
**<u>निशाणी क्रमांक ०८ खाली आदेश</u>**
**<u>(स्मिता वि. सुनिल)</u>**

अर्जदाराने सदरचा अर्ज हा फौजदारी प्रकिया संहिता (*यापुढे संक्षिप्तपणे ''फौ.प्र.सं.' असे संबोधले आहे* ) कलम १२५ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदाराचे कथन</u>**

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ चे पती असुन अर्जदार क्र.२ चे वडील आहेत. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांचा विवाह ३४ वर्षापुर्वी मौजा आर्णी येथे झाला होता. अर्जदार क्र.१ ला सुरुवातीचे २० वर्षे चांगल्याप्रकारे नांदवले. त्यानंतर गैरअर्जदार हा तिच्याकडे बांधकाम व्यवसाय सुरु करण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी करु लागले. त्यासाठी तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केला. उभयतांना अर्जदार क्र.२ ही मुलगी असल्यामुळे तिच्या भविष्याचा विचार करुन अर्जदार क्र.१ सर्व त्रास सहन करत होती. चार ते पाच वर्षापुर्वी गैरअर्जदाराने अर्चना विनोद ठाकरे हीच्यासोबत बेकायदेशीररित्या दुसरे लग्न केले आहे. दिनांक १७/०४/२०२२ रोजी गैरअर्जदार व त्याचे कुटूंबियांनी अर्जदार याला मारहाण केली होती. परंतु, गैरअर्जदाराच्या भितीने अर्जदाराने कुठेही तक्रार केली नव्हती. गैरअर्जदाराने अर्जदारांचा त्याग केलेला असुन त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. गैरअर्जदार हा "तुळजा बिल्डर्स डेवलपमेंट" या नावाने बांधकाम व्यवसाय करत आहे आणि त्याला तीन ते चार लाख रुपये प्रतिमाह उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ ला प्रती महीना रु.१०,०००/– व अर्जदार क्र.२ हीला प्रती महीना रु.५,०००/– सहज देवु शकतो.

**<u>गैरअर्जदाराचे कथन</u>**

३. नोटीस मिळाल्यानंतर गैरअर्जदार हजर झाले आणि त्यांनी *<u>निशाणी क्र.०९</u>* अन्वये त्यांचे लेखी म्हणने दाखल केले. त्यांनी अर्जातील संपूर्ण मजकुर

नाकारला आहे. गैरअर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, गैरअर्जदाराने अर्जदाराचा कधीही मानसिक व शारीरिक छळ केलेला नाही. याउलट, अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदारचा मानसिक छळ केल्यामुळे तो सध्या मानसोपचार तज्ञाकडे उपचार घेत आहे. त्यामुळेच गैरअर्जदार एका डोळयाने आंधळा झाला आहे. अर्जदार क्र.१ च्या त्रासाला कंटाळुन गैरअर्जदाराने तिला घटस्फोटाची नोटीस देखील पाठवली आहे. अर्जदाराने अंतरिम पोटगीचा अर्ज हा उशिरा दाखल केलेला आहे. अर्जदार ही ऑनलाईन साडी विक्रीचा मोठा व्यापार करते. तसेच अर्जदाराने तिच्या मुलीच्या नावाने असलेला भूखंड विक्रीसाठी काढलेला आहे. त्यामुळे तिला पोटगीची आवश्यकता नाही. याउलट, गैरअर्जदार हा कोणताही व्यवसाय करत नाही. त्यामुळे अर्ज खारीज होण्यास पात्र आहे.

**विचारार्थ मुद्दे**

४. दोन्ही पक्षांचे कथन पाहीले. दोन्ही पक्षांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यामुळे, खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठी कारणे खालीलप्रमाणे देत आहे. –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ही स्वतःसाठी रुपये १०,०००/– व अर्जदार क्र.२ साठी रु.५,०००/– गैरअर्जदाराकडुन प्रतीमहा अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होय. |
| २. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ करीताः–**

५. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कथनाचा विचार केला असता, उभयतांचे लग्न संबंध आजतागायत कायम आहे. तसेच उभयतांच्या लग्न संबंधातुन अर्जदार क्र.२

चा जन्म झालेला आहे, ही बाब उभय पक्षांना मान्य आहे. अर्जदाराच्या कथनानुसार ती सध्या विभक्त राहत आहे. याउलट गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार ही स्वमर्जीने विभक्त राहत आहे. प्रस्तूतचा अर्ज हा अंतरीम पोटगीसाठीचा आहे. सद्यस्थितीमध्ये या न्यायालयासमोर दोन्ही पक्षांचे तोंडी अथवा लेखी पुरावे नाहीत. त्यामुळे अंतरिम पोटगीच्या अर्जावर प्रथमदर्शनी मत नोंदवावे लागणार आहे.

६. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५(२) अन्वये अर्जदाराला मुळ अर्ज प्रलंबित असतांना अंतरिम पोटगी मागण्याचा अधिकार आहे. कलम १२५ नुसार कोणतीही विवाहीत स्त्री तिच्या पतीकडुन पोटगी मागु शकते. त्यासाठी अर्जदाराने सिध्द करणे आवश्यक आहे की, तिच्या पतीने तिचा विनाकारण त्याग केलेला आहे आणि अर्जदार स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा उहापोह हा कलम १२५ च्या वरिल तरतुदीनुसार होणे आवश्यक आहे.

७. वर चर्चा केल्याप्रमाणे अर्जदार आणि गैरअर्जदार यांचा झालेला विवाह उभयतांना मान्य आहे. अर्जदारांच्या कथनानुसार ती सध्या विभक्त राहत आहे आणि तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार हा तिचा पती आहे. त्यामुळे पत्नीचे पालनपोषण करण्याची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. तसेच मुळ अर्जाचा निकाल लागण्यास अजुन बराच अवधी आहे. तोपर्यंत अर्जदाराला आर्थीक मदत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदाराकडुन पैशाच्या स्वरुपात अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

८. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पत्नी पतीकडे पोटगी मागू शकते. परंतु, कलम १२५ अन्वये फक्त अज्ञान मुलांना पोटगी घेता येते. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार क्र.२ ही सज्ञान आहे. त्यामुळे तिला पोटगी देता येणार नाही.

९. अर्जदारांच्या कथनानुसार गैरअर्जदार हा बांधकाम व्यवसाय करतो आणि त्याला प्रतिमहा तीन ते चार लाख रुपये उत्पन्न मिळते. परंतू त्याबाबत कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला नाही. परंतु, अर्जदाराच्या वतीने काही भूखंडाचे खरेदीखताची प्रत कौटूंबिक हिंसाचाराच्या प्रकरणामध्ये

अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता, गैरअर्जदाराने चार ते पाच भूखंडाची विक्री केल्याचे दिसते. यावरुन गैरअर्जदाराची आर्थीक परिस्थीती सधन आहे, असे प्रथमदर्शनी दिसते. गैरअर्जदाराचे उत्पन्न आणि अर्जदार क्र.१ च्या गरजा यांचा विचार केला असता गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ ला प्रतिमहा रक्कम रुपये ३,०००/- अंतरीम पोटगी देणे न्यायोचित होईल. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ साठी</u>** –

१०. मुद्दा क्रमांक १ च्या अनुषंगाने अर्जदारांचा अर्ज मंजूर करुन खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ ला अंतरिम पोटगी म्हणुन रु.३,०००/- (तीन हजार रुपये) प्रती महीना दिनांक २५/०७/२०२२ पासुन द्यावे.

३. आदेशाची प्रत ही उभयपक्षांना मोफत द्यावी.

Digitally signed by SAGAR BABURAO SABALE
Date: 2022.11.23 17:00:39 +0530

दिनांकः- २३/११/२०२२

**(सागर बा.साबळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
आर्णी.